# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 30 April 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ३० एप्रिल २०२५ दुपारी १.०० वा.

****

मुंबईत उद्यापासून 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट' – वेव्ह्ज संमेलनाला प्रारंभ होत आहे. वांद्रे कुर्ला संकुलात जिओ वर्ल्ड सेंटरमध्ये आयोजित या परिषदेचं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत उद्घाटन होणार आहे. चार मे पर्यंत चालणाऱ्या या परिषदेत जगभरातून शंभर पेक्षा जास्त देश सहभागी होणार असून, विविध विषयांवर चर्चासत्रं, आणि अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

परिषदेच्या पहिल्या दिवशी 'भारत आणि महाराष्ट्र पॅव्हिलियन' तसंच वेव्हज प्रदर्शनाचं उद्घाटन होणार असून, काही महत्त्वपूर्ण घोषणा आणि सामंजस्य करार करण्यात येणार आहेत. या परिषदेच्या माध्यमातून देशातल्या सर्जनशील अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणात चालना मिळण्यास मदत होणार आहे.

****

महाराष्ट्र राज्य स्थापना दिनाचा ६६ व्या वर्धापन दिन म्हणजेच महाराष्ट्र दिन उद्या साजरा होत आहे. यानिमित्त ठिकठिकाणी ध्वजारोहणासह विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

छत्रपती संभाजीनगरचा मुख्य शासकीय समारंभ पोलीस आयुक्तालयातल्या देवगिरी मैदानात उद्या सकाळी आठ वाजता होणार आहे. या सोहळ्यात राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे.

लातूर इथं जिल्हा क्रीडा संकुलात पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते, तर बीड इथं पोलीस मुख्यालय कवायत मैदानात राज्यमंत्री इंद्रनील नाईक ध्वजारोहण यांच्या हस्ते होणार आहे.

****

दरम्यान, महाराष्ट्र दिनी उद्या मुख्यमंत्र्यांच्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमाचा निकाल जाहीर होणार. राज्यातल्या उत्कृष्ट पाच मंत्रालयीन विभागांचे सचिव, आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी, महापालिका आयुक्त, पोलिस आयुक्त, यांना गौरवण्यात येणार असल्याची माहिती, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

****

साडे तीन मुहूर्तांपैकी एक अक्षय्य तृतीया आज साजरी होत आहे. आजच्या दिवशी शुभ कार्याची सुरुवात केली जाते, तसंच या काळात सोने, चांदी आणि इतर वस्तू खरेदी करणं शुभ मानलं जातं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना अक्षय्य तृतीयेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हे पर्व सगळ्यांसाठी यश, वृद्धि आणि प्रसन्नता घेऊन येवो, असं त्यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

****

महात्मा बसवेश्वर जयंती आज साजरी होत आहे. समाजाप्रती महात्मा बसवेश्वर यांचा दृष्टीकोन आणि उपेक्षितांच्या उत्थानासाठी त्यांनी केलेले प्रयत्न आजही समाजाला मार्गदर्शन करत असल्याचं सांगत, पंतप्रधान मोदी यांनी बसवेश्वर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

आज संसद भवन संकुलात बसवेश्वर जयंतीनिमित्त केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव, किरेन रिजिजू, प्रल्हाद जोशी, शोभा करंदलाजे आणि खासदार तेजस्वी सूर्या यांच्यासह अनेक नेत्यांनी बसवेश्वरांना पुष्पांजली वाहिली. संसद भवन संकुलात असलेल्या गुरु बसवेश्वरांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी देशभरातून त्यांचे असंख्य अनुयायी येतात, असं, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी यावेळी पत्रकारांना सांगितलं.

****

अक्षय्य तृतीयेच्या पार्श्वभूमीवर उत्तराखंडमध्ये उत्तरकाशी जिल्ह्यात गंगोत्री आणि यमुनोत्री धामचे दरवाजे पारंपरिक पद्धतीनं उघडण्यात आले असून, आजपासून चार धाम यात्रेला सुरुवात झाली. केदारनाथ धामचे दरवाजे शुक्रवारी उघडतील आणि बद्रीनाथ धामचे दरवाजे रविवारी उघडतील.

****

मुंबई पोलिस आयुक्त पदी देवेन भारती यांची आज नियुक्ती करण्यात आली. भारती हे १९९४ च्या तुकडीचे पोलिस अधिकारी आहेत. विद्यमान पोलिस आयुक्त विवेक फणसळकर आज सेवानिवृत्त होत आहेत.

****

परभणी जिल्ह्यातल्या पुरातत्व वास्तूंना योग्य त्या संवर्धनाची आणि विकासाची गरज असल्याचं, पालकमंत्री मेघना साकोरे – बोर्डीकर यांनी म्हटलं आहे. जिल्ह्यातल्या पुरातत्व वास्तूंचं संवर्धन आणि विकास कामांच्या आढावा बैठकीत त्या काल बोलत होत्या. या ऐतिहासिक वारशाचं जतन करून पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करण्यात येईल, तसंच या माध्यमातून परभणी जिल्ह्याचं सांस्कृतिक महत्त्व जागतिक स्तरावर नेता येईल, असा मानस बोर्डीकर यांनी व्यक्त केला. जिल्ह्यात असलेल्या सर्व बारवांना संरक्षित करण्यात यावं, चारठाणा गाव हेरिटेज गाव करण्यासाठी नियोजन करावं, तसंच धारासूर इथल्या गुप्तेश्वर मंदिराच्या बाजूची जागा भूसंपादित करण्यासाठी प्रशासनाने पुरातत्व विभागाला सहकार्य करावं, आदी सूचना त्यांनी केल्या.

****

महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलात गेल्या वर्षभरात वीजचोरीची चार हजार ५२५ प्रकरणं उघडकीस आली आहेत. यात ग्राहकांनी सात कोटी ८७ लाख रुपयांची वीजचोरी केल्याचं आढळून आलं असून, या सर्वांवर दंडात्मक कारवाई करुन, साडेतीनशे प्रकरणांत वीजचोरीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांनी परिमंडलातल्या छत्रपती संभाजीनगर आणि जालना या दोन्ही जिल्ह्यांत वीजचोरीविरोधात नियमित कारवायांबरोबरच प्रत्येक महिन्यात विशेष मोहीम राबवण्याचे आदेश दिले आहेत.

****

बीड जिल्ह्यात परळी वैजनाथ इथल्या दिवाणी आणि फौजदारी न्यायालयाच्या नुतन इमारतीचा कोनशिला समारंभ उद्या मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नितीन सुर्यवंशी आणि रविंद्र जोशी यांच्या हस्ते होणार आहे. पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यावेळी उपस्थित असतील.

****